**L. A. BILL No. XXXVIII OF 2021.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA STAMP ACT.

## सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८.

## महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.

१९५८ चा ६०.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र मुद्रांक (दुसरी सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २०२१, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक ५ ऑगस्ट २०१६ पासून अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

१९५८ चा ६०.

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम २ मध्ये, खंड (ग) मधील, उप-खंड (चार) मधील, " भारतीय रिझर्व्ह बँकेचा प्रत्येक आदेश " या मजकुरानंतर पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :—

" आणि आजारी औद्योगिक कंपन्या (विशेष उपबंध) अधिनियम, १९८५, याच्या कलम १८ किंवा १९ अन्वये औद्योगिक व आर्थिक पुनर्रचना मंडळाने, त्यात विनिर्दिष्ट केलेल्या योजनेच्या मंजुरीच्या बाबतीत दिलेला प्रत्येक आदेश किंवा नादारी व दिवाळखोरी संहिता, २०१६, याच्या कलम ३१ अन्वये राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाने वियोजन आराखड्याच्या मंजुरीच्या बाबतीत दिलेला प्रत्येक आदेश".

१९८६ चा १.

२०१६ चा ३१.

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याच्या अनुसूची एकची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमास जोडलेल्या अनुसूची एक मध्ये, स्तंभ (१) मधील, अनुच्छेद २५ मधील, खंड (डअ) मधील " भारतीय रिझर्व्ह बँकेच्या आदेशाशी संबंधीत असेल तर " या मजकुरानंतर, पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :–

" आणि आजारी औद्योगिक कंपन्या (विशेष उपबंध) अधिनियम, १९८५, याच्या कलम १८ किंवा १९ अन्वये औद्योगिक व आर्थिक पुनर्रचना मंडळाने, त्यात विनिर्दिष्ट केलेल्या योजनेच्या मंजुरीच्या बाबतीत दिलेल्या प्रत्येक आदेशाशी किंवा नादारी व दिवाळखोरी संहिता, २०१६, याच्या कलम ३१ अन्वये राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाने वियोजन आराखड्याच्या मंजुरीच्या बाबतीत दिलेल्या प्रत्येक आदेशाशी संबंधित असेल तर ".

१९८६ चा १.

२०१६ चा ३१.

विधिग्राह्यीकरण.

**४.** (१) कोणत्याही न्यायालयाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा आदेश यांमध्ये किंवा मुख्य अधिनियमामध्ये एतद्‌विरूद्ध काहीही अंतर्भूत असेल तरीही, मुख्य अधिनियमाच्या अनुसूची एक मधील अनुच्छेद २५ च्या तरतुदींन्वये निर्धारित केलेले, बसविलेले व वसूल केलेले मुद्रांक शुल्क, उक्त अधिनियमाखालील प्राधिका-यांनी असे निर्धारण, बसवणे व वसुली करण्याच्या अनुषंगाने केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही कारवाई, यासंह, हे जणू काही महाराष्ट्र मुद्रांक (दुसरी सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २०२१ (यात यापुढे या कलमात ज्याचा निर्देश " सुधारणा अधिनियम " असा केला आहे), याद्वारे सुधारणा केलेल्या उक्त अनुच्छेद २५ च्या तरतुदी सर्व महत्त्वाच्या वेळी निरंतर अंमलात होत्या असे समजून, कायद्यानुसार विधिग्राह्यरीतीने बसविण्यात व वसूल करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार,–

२०२१ चा महा....

(अ) मुद्रांक शुल्क बसविण्याच्या व ते वसूल करण्याच्या संबंधात मुख्य अधिनियमाअन्वये प्राधिका-यांनी केलेल्या किंवा हाती घेतलेल्या सर्व कारवाया, कार्यवाह्या किंवा गोष्टी, सर्व प्रयोजनांसाठी, मुख्य अधिनियमाच्या तरतुदींनुसार करण्यात आल्या किंवा हाती घेण्यात आल्या असल्याचे मानण्यात येईल ;

(ब) अशा प्रकारे बसविलेल्या आणि वसूल केलेल्या मुद्रांक शुल्काच्या परताव्यासाठी उक्त प्राधिका-यांविरूद्ध कोणत्याही न्यायालयात कोणताही दावा किंवा इतर कार्यवाही दाखल करता येणार नाही किंवा चालवता येणार नाही ;

(क) कोणतेही न्यायालय किंवा इतर कोणतेही प्राधिकरण, अशा प्रकारे बसविलेल्या किंवा वसूल केलेल्या मुद्रांक शुल्काचा परताव्याचा निदेश देणा-या कोणत्याही हुकूमनाम्याची किंवा आदेशाची अंमलबजावणी करणार नाही.

(२) शंकानिरसनार्थ, याद्वारे, असे घोषित करण्यात येते की, पोट-कलम (१) मधील कोणत्याही गोष्टीमुळे, एखाद्या व्यक्तीला,–

(अ) पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या मुद्रांक शुल्काच्या कोणत्याही आकारणीस, पुनर्आकारणीस, बसवणीस किवा वसुलीस, सुधारणा अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदींनुसार हरकत घेण्यास ; किंवा

(ब) सुधारणा अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या, मुख्य अधिनियमान्वये मुद्रांक शुल्काच्या स्वरुपात तिच्याकडून देय असलेल्या रकमेपेक्षा, मुख्य अधिनियमान्वये तिने अधिक भरणा केलेल्या कोणत्याही मुद्रांक शुल्काच्या परताव्याची हक्क मागणी करण्यास,

प्रतिबंध होतो, असा अन्वयार्थ लावण्यात येणार नाही.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

कंपन्यांचे एकत्रीकरण, विलीनीकरण, निर्विलीनीकरण, व्यवस्था किंवा पुनर्रचना या बाबतीत, कंपनी अधिनियम, २०१३ (२०१३ चा १८) अन्वये उच्च न्यायालयाचे, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाचे आदेश आणि केंद्र सरकारने दिलेली पुष्टी आणि बँक कंपन्यांच्या एकत्रीकरणाच्या किंवा पुनर्रचनेच्या बाबतीत, बँक विनियम अधिनियम, १९४९ (१९४९ चा १०), याच्या कलम ४४अ अन्वये भारतीय रिझर्व बँकेने दिलेला आदेश यांचा महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा ६०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे), याच्या कलम २ च्या खंड (ग) मध्ये अंतर्भूत असलेल्या "अभिहस्तांतरणपत्र" याच्या व्याख्येमध्ये समावेश केला आहे आणि त्यावर उक्त अधिनियमाच्या अनुसूची एक च्या अनुच्छेद २५ (डअ) अन्वये मुद्रांक शुल्क आकारणी योग्य आहे.

२. आजारी औद्योगिक कंपन्या (विशेष उपबंध) अधिनियम, १९८५ (१९८६ चा १) (यात यापुढे ज्याचा निर्देश "आजारी औद्योगिक कंपन्या अधिनियम" असा केला आहे), याच्या कलम १८ अन्वये औद्योगिक व वित्तीय पुनर्रचना मंडळाने (बीआयएफआर), वित्तीय पुनर्रचना योजनेच्या मंजुरीच्या बाबतीत आजारी औद्योगिक कंपन्यांच्या पुनरुज्जीवनाचा भाग म्हणून, एकत्रीकरण, पुनर्रचना, इत्यादींसह, आजारी औद्योगिक कंपनीच्या योग्य व्यवस्थापनाच्या बाबतीत, आदेश दिलेले आहेत. तसेच, आजारी औद्योगिक कंपन्या अधिनियमाच्या कलम १९ अन्वये, औद्योगिक व वित्तीय पुनर्रचना मंडळाने अशा आजारी औद्योगिक कंपनीस वित्तीय सहाय्य करण्याची तरतूद करण्यासाठी योजना मंजूर केल्या आहेत.

निगम ऋणकोच्या पुनर्रचनेकरिता आणि नादारी निर्णयाकरिता, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाने नादारी व दिवाळखोरी संहिता, २०१६ (२०१६ चा ३१) (यात यापुढे ज्याचा निर्देश "नादारी संहिता" असा केला आहे), याच्या कलम ३१ अन्वये विनियोजन आराखडा मान्य करते त्यात विलीनीकरण, एकत्रीकरण व निर्विलीनीकरण या मार्गांसह, निगम ऋणकोच्या पुनर्रचनेच्या तरतुदी समाविष्ट आहेत.

आजारी औद्योगिक कंपन्या अधिनियमाअन्वये आणि नादारी संहिते अन्वये, औद्योगिक व वित्तीय पुनर्रचना मंडळाच्या आणि राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाच्या अशा आदेशांमध्ये, कंपन्यांचे एकत्रीकरण, विलीनीकरण आणि निर्विलीनीकरण करण्याची तरतूद असून त्यात भाग (शेअर) वाटणे किंवा त्याचे नियत वाटप करणे अथवा एका कंपनीकडून दुस-या कंपनीकडे मत्तांचे व दायित्त्वांचे हस्तांतरण यांचा अंतर्भाव असतो.

३. महसुलात वाढ करण्याकरिता आणि कंपन्यांचे एकत्रीकरण, विलीनीकरण, इत्यादींशी संबंधित असणा-या विविध अधिनियमांन्वये, वेगवेगळ्या प्राधिकरणाने पारित केलेल्या आदेशांच्या बाबतीत, मुद्रांक शुल्काच्या आकारणीत एकरुपता आणण्यासाठी, उच्च न्यायालयाच्या, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाच्या आणि भारतीय रिझर्व बँकेच्या वर उल्लेखिलेल्या आदेशांच्या धर्तीवर, औद्योगिक व वित्तीय पुनर्रचना मंडळाच्या व राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाच्या अशा आदेशांवर देखील मुद्रांक शुल्क आकारणे शासनास इष्ट वाटते. नादारी संहिता ५ ऑगस्ट २०१६ पासून अंमलात आला असल्याने, औद्योगिक व वित्तीय पुनर्रचना मंडळाच्या आणि राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाच्या अशा आदेशांवर ५ ऑगस्ट २०१६ पासून भूतलक्षी प्रभावाने, मुद्रांक शुल्क आकारणे, शासनास इष्ट वाटते. त्या प्रयोजनासाठी, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा ६०), याच्या कलम २ चा खंड (ग) आणि अनुसूची एक च्या अनुच्छेद २५(डअ) मध्ये यथोचितरित्या सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

अशा सुधारणेपूर्वी, औद्योगिक व वित्तीय पुनर्रचना मंडळाच्या आणि राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाच्या अशा आदेशांवर बसविलेले आणि वसूल केलेले मुद्रांक शुल्क विधिग्राह्य करण्यासाठी यथोचित तरतुदी करण्याचे देखील प्रस्तावित केले आहे.

४. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक १६ डिसेंबर, २०२१.

**बाळासाहेब थोरात,**
महसूल मंत्री.

## वित्तीय ज्ञापन

विधेयकाच्या खंड २ व ३ मध्ये, कंपन्यांचे एकत्रीकरण, विलिनीकरण, इत्यादींशी संबंधित असणा-या विविध अधिनियमांन्वये, वेगवेगळ्या प्राधिकरणाने पारित केलेल्या आदेशांच्या बाबतीत मुद्रांक शुल्क आकारण्यामध्ये एकरूपता आणण्यासाठी आजारी औद्योगिक कंपन्या (विशेष उपबंध) अधिनियम, १९८५ (१९८६ चा १), याच्या कलम १८ किंवा १९ अन्वये, त्यात विनिर्दिष्ट केलेल्या योजनांच्या मंजुरीच्याबाबत औद्योगिक व वित्तीय पुनर्रचना मंडळाने दिलेल्या प्रत्येक आदेशावर, अथवा वियोजन आराखड्याच्या मान्यतेसंबंधात नादारी व दिवाळखोरी संहिता, २०१६ (२०१६ चा ३१) याच्या कलम ३१ अन्वये राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाने दिलेल्या प्रत्येक आदेशावर मुद्रांक शुल्क आकारण्याच्या दृष्टीने, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा ६०), याचे कलम २ (ग) आणि अनुसूची एक मधील अनुच्छेद २५ (डअ) यांमध्ये सुधारणा करण्याचे प्रस्तावित आहे.

राज्य विधानमंडळाचा अधिनियम म्हणून हे विधेयक अधिनियमित झाल्यावर, राज्याच्या एकत्रित निधीतून आवर्ती किंवा अनावर्ती खर्चाचा अंतर्भाव असणारी कोणतीही तरतूद या विधेयकात नाही.

## भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ अन्वये राज्यपालांची शिफारस

(महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग, आदेशाची प्रत)

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ याच्या खंड (१) अन्वये महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून, ते महाराष्ट्र मुद्रांक (दुसरी सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२१ पुरःस्थापनार्थ घेण्याबाबत महाराष्ट्र विधानसभेस शिफारस करीत आहेत.

**सन २०२१ चे वि.स. विधेयक क्रमांक ३८—महाराष्ट्र मुद्रांक (दुसरी सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२१ याचे परिशिष्ट**

**(महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ यातील उतारे)**

**(सन १९५८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६०)**

**१.** * * * *

**२.** या अधिनियमामध्ये विषय किंवा संदर्भ यात काहीही प्रतिकूल नसेल तर,— व्याख्या.

(अअ) ते (फ) * * * *

(ग) अभिहस्तांतरणपत्र यात,

(एक) विक्रीनंतरचे अभिहस्तांतरण,

(दोन) प्रत्येक संलेख,

(तीन) कोणत्याही दिवाणी न्यायालयाचा प्रत्येक हुकूमनामा किंवा अंतिम आदेश ;

(चार) कंपन्यांचे (मूळ कंपनीच्या दुय्यम कंपन्यांच्या समावेशासह) एकत्रीकरण, विलीनीकरण, निर्विलीनीकरण, संव्यवस्था किंवा पुनर्रचना यासंबंधात कंपनी अधिनियम, १९५६ याच्या कलम ३९४ अन्वये उच्च न्यायालयाने दिलेला प्रत्येक आदेश किंवा कंपनी अधिनियम, २०१३ याच्या कलमे २३० ते २३४ अन्वये राष्ट्रीय कंपनी विधि न्यायाधिकरणाने दिलेला प्रत्येक आदेश किंवा कंपनी अधिनियम, २०१३ याच्या कलम २३३ च्या पोट-कलम (३) अन्वये केंद्र शासनाने दिलेली प्रत्येक पुष्टी आणि बँक व्यवसाय कंपन्यांच्या एकत्रीकरणाच्या किंवा पुनर्रचनेच्या संबंधात बँकिंग विनियमन अधिनियम, १९४९ याच्या कलम ४४क अन्वये भारतीय रिझर्व्ह बँकेचा प्रत्येक आदेश ;

ज्या संलेखाद्वारे मालमत्ता—मग ती जंगम असो की स्थावर असो- अथवा कोणतीही संपदा किंवा कोणत्याही मालमत्तेतील हितसंबंध, दोन हयात व्यक्तीच्या दरम्यान एकीकडून दुस-या व्यक्तीकडे हस्तांतरित करण्यात येईल किंवा तिच्याकडे निहित होईल आणि ज्यांसाठी अन्यथा अनुसूची एकमध्ये विनिर्दिष्टपणे तरतूद केलेली नसेल अशा पुढील संलेखाचा समावेश होतो :—

**स्पष्टीकरण.—**ज्याद्वारे कोणत्याही मालमत्तेचा सहमालक आपला हितसंबंध मालमत्तेच्या दुस-या सहमालकाकडे हस्तांतरित करतो आणि जो वाटणीपत्र नसेल असा संलेख हा, या खंडाच्या प्रयोजनांस्तव, ज्याद्वारे दोन हयात व्यक्तींमध्ये आपसात मालमत्तेचे हस्तांतरण करण्यात आले आहे. असा संलेख असल्याचे मानण्यात येईल ;

(गअ) ते (प) * * * *

**३.** ते **७६.** * * * *

**अनुसूची एक**

**संलेखांवरील मुद्रांक शुल्क**

**(कलम ३ पहा)**

| संलेखाचे वर्ण (१) | उचित मुद्रांक शुल्क (२) |
|---|---|
| **१.** ते **२४.** ** ** ** | |
| **२५.** अभिहस्तांतरणपत्र.—(अनुच्छेद ५९ खाली ज्यावर शुल्क आकारण्यात येते किंवा ज्यास त्याबाबत माफी मिळते असे हस्तांतरणपत्र नव्हे)— | |
| अशा अभिहस्तांतरणपत्रासंबंधीची विषयवस्तू असलेल्या मालमत्तेच्या वास्तविक बाजार मूल्यावर,— | |
| (अ) ते (ड) ** ** ** | |
| (डअ) कंपन्यांचे (मूळ कंपनीच्या दुय्यम कंपन्यांसह) एकत्रीकरण, विलीनीकरण, निर्विलीनीकरण, संव्यवस्था किंवा पुनर्रचना यासंबंधातील, कंपनी अधिनियम, १९५६ याच्या कलम ३९४ अन्वये उच्च न्यायालयाच्या आदेशाशी किंवा कंपनी अधिनियम, २०१३ याची कलमे २३० ते २३४ अन्वये राष्ट्रीय कंपनी विधि न्यायाधिकरणाच्या आदेशाशी किंवा कंपनी अधिनियम, २०१३ याच्या कलम २३३ च्या पोट-कलम (३) अन्वये केंद्र शासनाने दिलेल्या पुष्टीशी; किंवा बँक व्यवसाय कंपन्यांच्या एकत्रीकरणाच्या किंवा पुनर्रचनेच्या संबंधात बँकिंग विनियमन अधिनियम, १९४९ याच्या कलम ४४क खालील भारतीय रिझर्व्ह बँकेच्या आदेशाशी संबधित असेल तर, | अदलाबदल करताना किंवा अन्यथा देण्यात आलेल्या किंवा वाटप करण्यात आलेल्या किंवा शेअर्सच्या बाजार मूल्याच्या आणि अशा एकत्रीकरणाकरिता दिलेल्या मोबदल्याच्या एकूण रकमेच्या १० टक्के :<br>परंतु, या खंडान्वये आकारणीपात्र असलेली शुल्काची रक्कम,—<br>(एक) हस्तांतरक कंपनीच्या महाराष्ट्र राज्यात स्थित असलेल्या स्थावर मालमत्तेच्या वास्तविक बाजारमूल्याच्या ५ टक्के एवढी रक्कम ; किंवा<br>(दोन) अदलाबदल करताना किंवा अन्यथा देण्यात आलेल्या किंवा वाटप करण्यात आलेल्या शेअर्सच्या बाजारमूल्याच्या आणि अशा एकत्रीकरणाकरिता दिलेल्या मोबदल्याच्या एकूण रकमेच्या ५ टक्के एवढी रक्कम,<br>यापैकी जी अधिकतम असेल त्या रकमेपेक्षा जास्त असणार नाही :<br>परंतु आणखी असे की, पुनर्रचनेच्या किंवा निर्विलीनीकरणाच्या बाबतीत आकारणीपात्र शुल्क,—<br>(एक) निर्विलीनीकरण केलेल्या कंपनीकडून हस्तांतरित करण्यात आलेल्या निर्माणक कंपनीच्या महाराष्ट्र राज्यात स्थित असलेल्या स्थावर मालमत्तेच्या वास्तविक बाजारमूल्याच्या ५ टक्के एवढी रक्कम ; किंवा<br>(दोन) निर्माणक कंपनीला देण्यात आलेल्या किंवा वाटप करण्यात आलेल्या शेअर्स बाजारमूल्याची आणि अशा निर्विलीनीकरणाकरिता दिलेल्या मोबदल्याची रक्कम याच्या एकूण रकमेच्या ०.७ टक्के,<br>यापैकी जी अधिकतम असेल ज्या रमकेपेक्षा जास्त असणार नाही. |
| **२६.** ते **६३.** ** ** ** | |
| **अनुसूची दोन.** ** ** ** | |

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८. ]**

**[ महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[ श्री. बाळासाहेब थोरात,**
महसूल मंत्री. **]**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई